॥ श्री गजानन प्रसन्न ॥
॥ श्री केशवराज प्रसन्न ॥

आपली आहे प्रगतीची

# वाटचाल

* वर्ष २२ वे, अंक ३
* दि. १५ सप्टेंबर २०२२
* किंमत रु. २०/-

देवधर ❁ दीक्षित ❁ वझे
देवधर
कौशिक गोत्री
मंडळ



# देवधर मंडळ कार्यकारिणी

## दि. १ /४/२०१९ ते दि. ३१/३/२०२४

✻ **अध्यक्ष**

**सी.ए. सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान २१/१६२)
१०२, आय विंग, प्रणय नगर, राममंदिर रोड (विस्तारित), बाभई, बोरिवली (प.), मुंबई ४०००९१
दूरध्वनी : ०२२-२८९८१८५६
मोबाईल : ९२२३३६६६४०, ९२२३५०६९८८

✻ **उपाध्यक्ष**

**ॲड. पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान ३६०/१६९)
ब्लॉक नं. २, भागिरथी टॉवर्स, सर्व्हे नं. ६, हि. नं. ११, कोकण एक्सप्रेस हॉटेल लेन, कोथरूड, पुणे ४११०३८. ❖ मोबाईल : ९८६०३०६३४४

✻ **कार्यवाह**

**सरिता मुकुंद देवधर** (कु. वृ. पान नं. ३५९/१२९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६, गिरगांव, मुंबई ४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८९३९३०
मोबाईल : ९८२०६५९४४७

✻ **सहकार्यवाह**

**सौ. पूर्वा प्रमोद देवधर** (स्वीकृत)
(कु. वृ. पान ८८२/१३२२)
११/१२ सी, दुसरा मजला, झावबा वाडी, ठाकूरद्वार, मुंबई ४००००२. मोबाईल : ९८६९९३९०७२

✻ **कोषाध्यक्ष**

**सी.ए. अकल्पिता चिंतामणी देवधर**
(कु. वृ. पान८९८/१७७८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गावदेवी चौक, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ९८२०३५६४१३

✻ **वाटचाल (मुद्रक, प्रकाशक)**

आशिष राम देवधर (कु. वृ. पान ३१/२०३६)
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ७०४५३५३६०२

✻ **सभासद**

**नारायण (दिलिप) गोविंद देवधर** (कु.वृ. पान ४१८/१२३)
बी/१०३, आर.एन. ए. हाईट्स, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३.
दूरध्वनी : ०२२-२८२५२१४५
मोबाईल : ९८१९९७२५११

✻ **सभासद**

✻ **श्री. वासुदेव नारायण देवधर** (कु.वृ.पान ४९७/१४५) (स्वीकृत)
सी/३, १०२, सॅटेलाईट क्लासिक, रेल्वे स्टेशनजवळ, गुंफा रोड, जोगेश्वरी (पू.), मुंबई ४०००६०
दूरध्वनी : ०२२-२८२६१०२८, मो.: ९८२०१३४०८४

✻ **संजय सुधाकर देवधर** (कु. वृ. पान ४९१/१७७९)
ए/४२, अनुभव कॉम्प्लेक्स, स्नेह पॅराडाईज, एम.आय.टी कॉलज रोड, कोथरूड, पुणे ४११०३८.
मोबाईल : ९८२३०७३३११

✻ **श्री. समीर सुरेश देवधर** (कु. वृ. पान ५८८/२२४१) (स्वीकृत)
बी/२४, कैलासधाम सोसायटी, गोपाळनगर गल्ली क्र. १, टायटन शोरूम च्या जवळ, डोंबिवली (पू.) ४२१२०१
मोबाईल : ९८३३१४८४८५

✻ **श्री. विष्णू विनायक देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ४३९/१५२८)
बी-४, रूम नं. ३, सप्तर्षी सोसायटी, पांडुरंग वाडी, आनंदनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पू.) ४२१२०१
दूरध्वनी : ०२५१-२८०१८३०, मो. : ९८३३१५३९८९

✻ **कु. मीरा जगदीश देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ५३४/२४०६)
स्वप्नशिल्प, फ्लॅट नं. १, पहिला मजला,
नयनतारा नर्सिंग होम शेजारी, गुलमोहर कॉलनी,
सांगली ४१६४१६. मोबाईल : ७०८३८४१४५५

✻ **श्रीमती शुभांगी सुनिल देवधर** (कु. वृ. पान ३१०) (स्वीकृत)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर, नाशिक रोड, नाशिक ४२२१०१
दूरध्वनी : ०२५३-२४६४७८०
मोबाईल : ९८९०२४०५२२

✻ **मानद लेखा परीक्षक**

**सी.ए. किरण अनंत देवधर** (कु.वृ. पान १६२/१३७४)
१८ ई स्क्वेअर, स्टेट बँकेच्या वर, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०००५७
मोबाईल : ९८२०३३५०९३

# अध्यक्षांचे मनोगत



नमस्कार.

१५ ऑगस्ट २०२२ रोजी भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरील भाषणातून भारतीयांना पंचप्रण सांगितले, ते असे

१) विकसित भारत

२ ) गुलामीच्या प्रत्येक अंशापासून मुक्तता

३ ) आपल्या राष्ट्रीयत्वाचा अभिमान

४) एकता आणि एकजूट

५ ) नागरिकांचे कर्तव्य

पुढील पंचवीस वर्षाच्या अमृतकाळाचा हा यशमंत्र पंतप्रधानांच्या श्रेष्ठ भारत या संकल्पनेसाठी पोषक आहे आणि राष्ट्रोत्थानासाठी याचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे.

श्री गणेश, गणपती हे महाराष्ट्राचे आणि आपल्या सर्वांचे आराध्य दैवत. विद्येची देवता, सुखकर्ता विघ्नहर्ता अशी ओळख असलेल्या श्री गणरायाच्या पूजनाने आपण सर्व शुभ कार्याचा प्रारंभ करतो. अशा या श्री गणेशाचे आगमन आपल्या सगळ्यांच्या घराघरांमध्ये झाले आणि गणेशोत्सव कोरोनाच्या दोन वर्षाच्या कालखंडानंतर यथासांग संपन्न झाला

आता येणारा काळात दसरा दिवाळी हे आपण नेहमीच्या उत्साहाने साजरे करूया.

२०२२ चे वार्षिक स्नेहसंमेलन पुणे येथे १४ आणि १५ मे रोजी संपन्न झाले. या वर्षी प्रथमच सशुल्क केले होते. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला.

आपली ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कल्याण येथे २० ऑगस्ट रोजी नेहमीप्रमाणे पार पडली. त्यानंतर मुक्त व्यासपीठ हा कार्यक्रमही तरुण सभासदांच्या सहभागामुळे मनोरंजक झाला.

या सभेमध्ये देवधर मंडळाचे उपक्रम वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेहसंमेलन, आनंद मेळावा, त्रैमासिक वाटचाल उत्तमरित्या व्हावे यासाठी संवर्धन देणगी (वार्षिक वर्गणी) जास्तीत जास्त सभासदांनी ती द्यावी अशी सूचना केली. सध्या कमी होत असलेले बँकेतील ठेवींवरील व्याज लक्षात घेता, यापुढील काळात मंडळाची आर्थिक बाजू बळकट व्हावी यासाठी ही वर्गणी अतिशय महत्त्वाची आहे. या सूचनेचे महत्त्व ध्यानात घेऊन ही संवर्धन देणगी प्रतिवर्षी प्रत्येक सभासदाने रुपये तीनशे मात्र, मंडळाला देऊ या. या गोष्टीचे महत्त्व आपल्या कुलबांधवांना समजावून सांगणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे आणि ते जर आपण प्रामाणिकपणे पार पाडले तर मंडळाची आर्थिक स्थिती नक्की सुधारेल.

आपण या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद द्याल असा सार्थ विश्वास आहे. ही रक्कम आपण रोख स्वरूपात किंवा बँक खात्यात जमा करू शकता. यासाठी कार्यकारिणीचे सभासद आपल्याशी संपर्क साधतील.

आता कोरोनाचे संकट टळले आहे असे म्हणता येईल. वार्षिक स्नेहसंमेलनाव्यतिरिक्त निरनिराळ्या ठिकाणच्या कुलबांधवांना आनंद मेळाव्याद्वारे प्रत्यक्ष भेटता येईल. त्यांचा परिचय

.....पान क्र. ४ वर

# देवधर मंडळ ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा : इतिवृत्त

देवधर मंडळाची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ३१ जुलै २०२२ रोजी सकाळी दहा वाजता सहकार मंदिर, नमस्कार मंडळासमोर कल्याण, (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आली होती.

आगमन झाल्यावर सर्व सभासदांनी इडली सांबार चटणी आणि चहा - कॉफी या अल्पोहाराचा आस्वाद घेतला.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने ठीक १० वाजता सभेला सुरुवात झाली. सभेस ४८ सभासद उपस्थित होते. सभा फेसबुकवर लाईव्ह करण्यात आली होती; त्यामुळे बऱ्याच जणांना सभेला उपस्थित राहण्याचा आनंद घेता आला.

कार्यवाह सरितातार्ई देवधर यांनी सर्व सभासदांचं स्वागत केलं. सभेपुढील कामाचा अजेंडा वाचून दाखवला.

माननीय अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन व केशवराज पूजन झाले. सर्व सदस्यांनी केशवराज आरती म्हटली. त्यानंतर अध्यक्षांच्या अनुमतीने सभेच्या कामकाजास रीतसर सुरुवात झाली.

**श्रद्धांजली** : अहवाल वर्षातील देवधर, दीक्षित, ढमढेरे कुळातील दिवंगत ज्ञात, अज्ञात कुलबंधु-भगिनी व माहेरवाशिणी यांना सर्व सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली वाहिली. वाटचाल या आपल्या त्रैमासिकात दिवंगतांची नावे आली आहेतच.

**सर्वसाधारण सभेचा अहवाल मंजुरी** :

कार्यवाहांनी ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत सादर केला. सभासदांनी तो सर्वानुमते मंजूर केला.

**कार्यवाहांचा वार्षिक अहवाल :**

सन २०२१-२२ मधील घडामोडींचा कार्यवाहांचा अहवाल १५ मार्च २०२२ च्या वाटचालमध्ये छापून आला आहे. तो सर्वांनी वाचला असेलच असे समजून सर्व सभासदांना त्याबाबत मंजुरी विचारण्यात आली. सभासदांनी तो सर्वांनुमते मंजूर केला.

**लेखा परीक्षित आय–व्यय पत्रक व ताळेबंद** :

सन २०२१-२२ चे लेखा परीक्षित आय-व्यय पत्रक व ताळेबंद १५ मार्च २०२२ च्या वाटचाल मध्ये प्रसिद्ध करण्यात आले होते व त्यावरील हरकती मागविण्यात आल्या होत्या. मात्र कोणत्याही हरकती आलेल्या नाहीत.

सभागृहात उपस्थित सभासदांच्या शंका निरसनाच्या कार्यक्रमात सुनील देवधर यांनी शंका उपस्थित केली. छोट्या परिपक्व मुदत ठेवी मोडण्याबाबत आणि सरकारी बँकांच्या ठेवी वाढवण्याबद्दलच्या या शंकेचं निरसन कोषाध्यक्ष अकल्पिता देवधर यांनी केलं.

इतर काही शंका किंवा हरकत नसल्याने व कुठलाही प्रश्न उपस्थित न झाल्याने आय-व्यय पत्रक आणि ताळेबंद सर्वानुमते मंजूर झाले आहे असे अध्यक्षांनी सांगितले.

**लेखापरीक्षकांची नेमणूक :**

सन २०२१-२२ या वर्षासाठी लेखा परीक्षणासाठी, लेखापरीक्षक सी.ए. श्री. किरण देवधर (विलेपार्ले) यांनी या वर्षीही आपली तयारी दर्शवली आहे.

त्यांच्या नेमणुकीबाबत अध्यक्षांनी उपस्थितांना विचारणा केली. सर्व उपस्थितांनी

त्यांच्या नावाला संमती दिली. त्यामुळे या वर्षीही सी.ए. श्री. किरण देवधर मंडळाच्या लेखा परीक्षणाचे काम पाहणार आहेत.

गेली अनेक वर्षे श्री. किरण देवधर मंडळाच्या लेखापरीक्षणाचे काम विना मोबदला करीत आहेत. सर्वांनी त्यांचे आभार मानले.

**सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक :**

सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक कोषाध्यक्ष अकल्पिता देवधर यांनी वाचून दाखवले. सर्व सभासदांनी ते मंजूर केले.

**अध्यक्षांचे मनोगत :**

माननीय अध्यक्ष श्री. सुरेश देवधर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या वर्षीच्या म्हणजे १४ आणि १५ मे २०२२ रोजी झालेले वार्षिक स्नेहसंमेलन हे सशुल्क असूनही त्यास चांगला प्रतिसाद मिळाला असेही त्यांनी सांगितले.

वाटचाल अंकाच्या छपाई खर्चाबाबत चर्चा झाली असता काही सभासदांनी अजूनही प्रिंट किंवा हार्ड कॉपी चा आग्रह धरला आहे. ज्यांना ऑनलाईन हवा आहे त्यांना त्याप्रमाणे पाठवल्यास वाटचालचा पोस्टेज खर्च कमी होईल.

त्याचप्रमाणे संग्राह्य मासिक म्हणून वाटचाल हे एक चांगलं उदाहरण आहे तर ते बंद करू नये अशी विनंती श्री गजानन शंकर देवधर यांनी केली आणि वाटचालसाठी निधीही दिला.

माननीय अध्यक्ष सुरेश देवधर हे सगळ्या नव्या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन नवोदितांना पाठिंबा देतात. म्हणून त्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे आभार मानण्यात आले. त्याचप्रमाणे पाचशे पेक्षाही अधिक सभासदाशी वैयक्तिक संपर्क साधून कार्यकारिणी सदस्य- श्री समीर देवधर (डोंबिवली) यांनी निधी जमविण्यात सिंहाचा वाटा उचलला ,त्यांच्या या सत्कार्याला प्रोत्साहन म्हणून त्यांनाही गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आलं.

संजय देवधर, पुणे यांनी, मंडळाचे वार्षिक उपक्रम आणि त्यासाठी होणाऱ्या खर्चाची उत्तम आणि कायमस्वरूपी तरतूद म्हणून प्रत्येक सभासदाने संवर्धन निधी, वार्षिक रु. ३००/- न चुकता व नियमित द्यावा अशी विनंती केली.

आपण प्रत्येकाने मंडळाच्या कार्यक्रमासाठी येताना आपल्याबरोबर आपल्या घरातील सर्व तरुण आणि छोट्या मंडळींनाही आवर्जून बरोबर आणावे म्हणजे त्यांना चांगल्या कार्यक्रमाला जाण्याची सवय लागून मंडळाच्या पुढील वाटचालीसाठी त्यांचा उत्तम हातभार लागेल अशी सूचना समीर देवधर यांनी केली

आपल्या देवधर मंडळाची वेबसाईट काही तांत्रिक अडचणी असल्यामुळे नीट दिसत नाही. तांत्रिक देखभाल नियमित करावी असे एका सभासदाने सुचवल्याप्रमाणे संजय देवधर यांनी लवकरच ही तक्रार दूर करण्यासाठी त्याबद्दल प्रयत्न करू असे आश्वासन दिले आहे.

समीर देवधर, पांडुरंग वाडी, डोंबिवली यांनी गरजेनुसार निधी आणि वर्गणी यात नियमित वाढ करावी. अशी सूचना मांडली. त्यावर विचार केला जाईल असं कार्यकारिणीच्या वतीने सौ. पूर्वा देवधर यांनी सांगितलं.

माननीय अध्यक्ष श्री सुरेश देवधर यांनी वार्षिक सर्वसाधारण सभा, वार्षिक संमेलन, वाटचाल छपाई -पोस्टिंग इत्यादी सर्व खर्च करण्याची तजवीज म्हणून सर्वांनी संवर्धन निधी नियमित भरावा आणि गरजेनुसार मदत निधी वाढवण्याच्या कामात सर्वांनी हातभार लावावा म्हणजे जास्तीत जास्त लोकांना मदत देता येईल असं सर्वांना सांगितलं. कार्यवाह सरितताईंनीही

याबद्दल आवाहन केलं. उपाध्यक्ष पी. जी. देवधर यांनी सर्वांचे आभार मानले.

या सभेनंतर, मुक्त व्यासपीठ हा पहिला वाहिला कार्यक्रम सादर करण्यात आला. देवधर दीक्षित ढमढेरे या कुळांतील विशेषत: तरुण कलाकारांचे विविध कलागुण दर्शन आपल्या परिवाराला व्हावे, आणि त्याचबरोबर एकमेकांचा परिचय वाढून आपसात स्नेहसंबंध दृढ व्हावा, तरुण आणि छोट्यांची उपस्थिती वाढावी हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमात बारा जणांनी सहभाग घेतला होता. सुमित देवधर व श्रावणी देवधर, डोंबिवली यांनी उत्तम सूत्रसंचालन केले.

अंगूर रबडी, पुरी, बटाटेवडे, मसालेभात अशा सुग्रास भोजनानंतर या वार्षिक सर्वसाधारण सभेची हसत खेळत उत्तम सांगता झाली.

**– सौ. पूर्वा देवधर**
सहकार्यवाह, देवधर मंडळ

पान क्र. १ वरून ....

करून घेता येईल. संवाद वाढू शकेल. एकमेकांना गरजेच्या वेळी मदत करून 'एकमेका सहाय्य करून अवघे होऊ समर्थ आणि श्रीमंत' हा उद्देश सफल होईल.

या वेळी असे आनंद मिळावे सातारा, औरंगाबाद, इंदोर, पुणे, नागपूर इत्यादी ठिकाणी आयोजित करण्याचा मानस आहे. त्या त्या ठिकाणच्या स्थानिक सभासदांनी यासाठी पुढाकार घेऊन त्याचे आयोजन करायला हवे. कार्यकारिणीचा सहभाग आणि प्रतिसाद उत्तमरित्या असेलच असे मी आपल्याला आश्वस्त करू इच्छितो.

येणाऱ्या काळातील सर्व सणसमारंभासाठी आपले सर्वांचे आयुष्य निरामय आरोग्यदायी आणि आनंदी जावे यासाठी केशवराज चरणी प्रार्थना!

**- सुरेश देवधर**
अध्यक्ष, देवधर मंडळ

# जलपरी आयुषी

नाशिक येथील प्रशांत व कीर्ती देवधर यांची कन्या आयुषी देवधर खरोखरच जलपरी.



२१/०८/२०२२ रोजी पुण्यात ज्या Regional competitions झाल्या त्यात शाळेच्या संघातर्फे चि. आयुषीने भाग घेतला होता. १०० मी free style मधे आयुषीला bronze medal मिळाले. तर ५० मी. Back strock मधे Silver medal मिळाले आहे. चि आयुषीचे देवधर परिवाराकडून हार्दिक अभिनंदन!

आयुषी वयाच्या ५ व्या वर्षापासून swimming शिकते आहे. आजपर्यंत अनेक स्पर्धांमधे तिने यश संपादन केले आहे. तिने मालवण येथे खुल्या समुद्रात १ किलोमीटर साठी असलेल्या स्पर्धेत २ वेळा भाग घेतला आहे. तर गेट वे ऑफ इंडिया येथील खुल्या समुद्रात २ किलोमीटर साठीच्या स्पर्धेतही भाग घेऊन यश संपादन केले आहे.

आयुषीला उत्तरोत्तर असंच यश मिळत राहो व देवधर दीक्षित ढमढेरे कुळाला कौतुक वाटेल अशी कीर्ती आयुषीने मिळवावी हीच सदिच्छा.

***

# क्रिकेट महर्षी दिनूकाका

**– मिलिंद ढमढेरे, पुणे**

प्राध्यापक आणि अष्टपैलू क्रिकेटपटू या दोन्ही आघाड्यांवर नावलौकिक मिळवणे ही काही सोपी गोष्ट नसते. विशेषतः ज्या वेळी खेळाडूंना नोकरीमध्ये फारशा सवलती मिळत नव्हत्या, अशा काळात या दोन्ही क्षेत्रांमध्ये नावलौकिक मिळवण्याचे अलौकिक कार्य प्राध्यापक दिनकर बळवंत देवधर यांनी केले. क्रिकेट महर्षी म्हणून अजरामर कीर्ती मिळविणाऱ्या या क्रिकेटपटूनी मैदानावरील शतकाप्रमाणेच खऱ्या जीवनातही शतक पूर्ण केले होते.



मी त्यांना हक्काने दिनूकाका म्हणतो याचे एक कारण म्हणजे अनेक अव्वल दर्जाचे क्रिकेटपटू घडविणाऱ्या पीवायसी मैदानाजवळ त्यांचे घर होते. पण प्रत्यक्षात त्यांचा संध्याकाळचा मुक्काम पीवायसी मैदानावरच असायचा आणि १९८० पासून पत्रकारितेमध्ये काम करताना मला अनेक वेळेला त्यांचा सहवास लाभला. त्यांच्याबरोबर क्रिकेटच्या जुने किस्से ऐकताना दोन-तीन तास सहज निघून कसे गेले हे कळायचे नाही. दुसरे कारण म्हणजे आमच्या देवधर-दीक्षित-ढमढेरे मंडळामध्ये ते अतिशय सक्रिय होते. मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमाला त्यांची उपस्थिती असायची. अनेक वेळेला त्यांच्या बंगल्यातच आमच्या मंडळाच्या कार्यकारणीची बैठक आयोजित केली जात असे.

मैदानावरील दिनूकाकांची उपस्थिती ही युवा खेळाडूंना नेहमीच प्रेरणादायक असायची. प्रथम दर्जाच्या ८१ सामन्यांमध्ये ४५०० हून अधिक धावा, त्यामध्ये ९ शतके आणि २७ अर्धशतके तसेच ११ बळी अशी त्यांची कामगिरी होती. एकाच डावात २४६ धावा ही त्यांची वैयक्तिक सर्वोच्च कामगिरी होती. १९४४ मध्ये नवानगर विरुद्धच्या रणजी सामन्यात महाराष्ट्राला विजय मिळवून देण्यात त्यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. या सामन्यातील दोन्ही डावांमध्ये त्यांनी शतके ठोकली होती. त्या वेळी ते फक्त ५३ वर्षांचे होते. भरवशाचा फलंदाज आणि लेगस्पिनर म्हणून त्यांनी दीर्घकाळ क्रिकेट क्षेत्राची सेवा केली. पहिल्या महायुद्धापूर्वी आणि दुसऱ्या महायुद्धानंतरही प्रथम दर्जाच्या सामन्यांमध्ये भाग घेण्याचा दुर्मीळ योग त्यांना लाभला. शंभर वर्षे जगणारे ते पहिले भारतीय क्रिकेटपटू होते.

स्पर्धात्मक क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे उपाध्यक्ष, राष्ट्रीय निवड समितीचे सदस्य, महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष आदी पदांवर काम करताना क्रिकेटचा प्रचार आणि प्रसार हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवले होते. युवा खेळाडूंसाठी नवनवीन योजना सुरू करीत त्यांची योग्य

रितीने अंमलबजावणी होते की नाही याबाबत ते नेहमीच जागरूक असायचे. क्रिकेटमध्ये त्यांनी केलेल्या कार्याची दखल केंद्र शासनाने घेतली होती. पद्मश्री आणि पद्मभूषण असे दोन्ही सन्मान त्यांना देण्यात आले होते, तसेच त्यांच्या निधनानंतर त्यांचे छायाचित्र असलेले एक टपाल तिकीटही काढण्यात आले होते.



क्रिकेट सामन्यांचे समालोचन सुरू झाल्यानंतर एकदा हौस म्हणून दिनूकाकांनी नेहरू स्टेडियमवर संस्कृतमध्ये काही मिनिटे क्रिकेट सामन्याचे वर्णन करीत त्यानंतर त्याचे भाषांतरही केले होते. दिनूकाकांच्या कन्या तारा, सुंदर आणि सुमन यांनी भारतीय संघातर्फे आंतरराष्ट्रीय स्तरावरील बॅडमिंटन सामन्यांमध्ये चमक दाखवली होती.

दिनांक २४ ऑगस्ट १९९३ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी दिनूकाकांचे निधन झाले. त्यांची स्मृती कायम राहवी म्हणून भारतीय क्रिकेट नियामक मंडळातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या आंतर विभागीय स्पर्धांना देवधर करंडक स्पर्धा म्हणून ओळखले जाते. गहुंजे येथील आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर त्यांचा पुतळाही उभारण्यात आला आहे. तेथे येणार प्रत्येक खेळाडू या पुतळ्यासमोर नतमस्तक होऊनच पुढे खेळावयास मैदानावर उतरतो.

***

## श्री. धनंजय देवधर

### (अल्पपरिचय)



नागपूर स्थित श्री. धनंजय देवधर हे सुप्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक असून तेथील अनेक सामाजिक संस्थांमध्येही सेवाकार्य करीत आहेत.

✻ संस्थात्मक ✻

✻ अध्यक्ष :
श्री परशुराम अर्बन क्रेडिट को-ऑप सोसा. (मर्या.)

✻ व्यावसायिक ✻

✻ द सी ब्रीझ रिसोर्ट
वेळणेश्वर (ता. गुहागार, जि: रत्नागिरी)
येथे ४८ खोल्यांचे रिसोर्ट

✻ हॉटेल' तृप्ती' ( प्रारंभ- १९७२)
शाकाहारी उपाहारगृह
'मोदी नं. २, सीताबर्डी, नागपूर

✻ हॉटेल निडोज ( प्रारंभ-१९८६)
परमिट रूम व मांसाहारी हॉटेल,
मुंजे चौक, नागपूर

✻ तृप्ती गार्डन रेस्टॉरेन्ट व बार,
हॉटेल तंदूर, ( प्रारंभ- १९९०)
वर्धा मार्ग, खापरी ( नागपूर)

✻ 'हॉटेल ग्रेट मराठा' ( प्रारंभ-१९९८)
(तीन तारांकित हॉटेल)
औद्योगिक वसाहत,परिसर, हिंगणा (नागपूर)

# कोकणच्या भूमीसंबंधी गांभीर्याने विचार करायला हवा

**– धनंजय देवधर,** नागपूर

चित्पावन ब्राह्मणांमध्ये 'देवधर' या आडनावाला एक वलय आहे. 'देवधर मंडळ' या चळवळीला ५४ वर्षाचा इतिहास आहे.अनेकांचे अविरत कष्ट, जिद्द, नि:स्वार्थ सेवा इत्यादीमुळे आज मंडळ मजबूत पायावर उभे आहे. देवधरांचे प्रबोधन, सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक संपन्नता, गरजूंना मदत व सामाजिक ऋण फेडण्यासाठी समाजसेवा ही मंडळाची जबाबदारी आहे.

भविष्यातील पद्मश्री, पद्मविभूषण, भारतरत्न घडविण्याची तसेच सनदी अधिकारी निर्माण व्हावे यासाठी संस्कारक्षम व जागृत मुला- मुलींसाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. 'देवधर मंडळा'कडे स्वतःची जागा व वास्तू असेल तर अनेक कार्यक्रम, उपक्रम, योजना, कल्पना या सहज राबवता येतील. या व अशा अनेक कारणांसाठी मंडळाकडे स्वतःची जागा व हक्कांची वास्तू असायलाच हवी व त्या दृष्टीने विचार आणि कृती करणे आवश्यक आहे.

म्हणायला आपण कोकणस्थ! पण कोकणात आपले काय प्रस्थ? २०२२ या वर्षात रत्नागिरी विमानतळ पूर्णपणे कार्यान्वित होईल (सध्या ८० टक्के काम पूर्ण झाले आहे.) असा विश्वास बाळगून प्रयत्न सुरू करण्यास हा उत्तम काळ आहे. कोकणात विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यात, महामार्गालगत व ज्या जागेवरून समुद्र दिसेल अशी साधारणतः ३० ते ४० गुंठे जागा ही प्राथमिक गरज. पक्की, सिमेंट- विटांची सुरक्षा भिंत ( कंपाऊंड वॉल), प्रवेशद्वार तसेच वीज पुरवठा हे क्रमशः आवश्यकच. बोअरवेल, विहीर ही लागेल. विविध प्रकारची झाडे उदा. सिंगापुरी नारळ, जायफळ, लवंग, दालचिनी, कोकम, काजू, बेल, सोनचाफा लागवडीचे नियोजनही करावे लागेल. यातून एक चांगला प्रोजेक्ट सभासदांपुढे ठेवून पैसे उभे करता येईल. यामुळे सध्याच्या परिस्थितीतील बँकेत मुदत ठेवी ( फीक्स डिपॉजिट) ठेवणे हे प्रकरण कालबाह्य होईल, असे वाटते. स्थावर मालमत्ता व जागेची गुंतवणूक दीर्घकाळासाठी अधिक लाभदायी ठरेल.

परशुराम भूमीवर परप्रांतीयांचा डोळा आहे. आजच हजारो एकर जमीन परप्रांतीयांनी खरेदी केली आहे. पुढच्या दोन वर्षानंतर कोकणात जमीन खरेदी करणे मराठी माणसांना अशक्य होईल. त्यामुळे आत्ताच विचारपूर्वक कृती करावी लागेल. अन्यथा पश्चाताप करण्यापलीकडे हाती काहीच राहणार नाही. प्रयत्न केल्यास श्री परशुराम व श्री केशवराज यश देण्यास समर्थ आहे.

ज्यांच्या मनगटात जोर आहे, रग आहे. मनात जबरदस्त आत्मविश्वास आहे व ज्यांना शांत झोप लागते. त्यानांच चांगली स्वप्ने पडतात व त्यांची स्वप्ने खरी सुध्दा होतात. आपण सर्वजण प्रयत्न करू या!

***

# शब्दकोडे

- रचनाकार : **श्री. पु. गो. देवधर,** पुणे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ✕ | २ | ३ | ✕ | ४ | ५ | ६ | | ✕ |
| ७ | | | | ७अ | ✕ | ८ | | ✕ | ९ |
| | ✕ | | ✕ | १० | ११ | | ✕ | ११ | |
| | १३ | ✕ | ✕ | १४ | | | ✕ | १५ | |
| १६ | | १७ | | ✕ | ✕ | १८ | १९ | ✕ | ✕ |
| २० | | | ✕ | २१ | २२ | ✕ | | ✕ | २३ |
| | ✕ | ✕ | ✕ | २४ | | २५ | ✕ | ✕ | |
| ✕ | २६ | | २७ | | ✕ | २८ | २९ | | |
| ३० | | ✕ | | ✕ | ३१ | | | ✕ | ✕ |
| ३२ | | | ✕ | ✕ | ३३ | | ✕ | ३४ | |

**आडवे शब्द :–**

२) तीर्थक्षेत्र ४) बाज/खाट ७) वेग कमी करणारा ८) फुलांची माळ १०) मऊ १२) बूड १४) लक्ष्मी १५) वाळवंट १६) मेळ नसणे १८) देव २०) सावध २१) देव २४) चिवट २६) एकत्र राहणे २८) अधिक महिना ३०) छाती ३१) न घाबरणारा ३२) दक्षिणा वाटण्याचे स्थान ३३) ४८० कागद ३४) कवन / काव्य

**उभे शब्द :–**

१) साथ २) निरस / नुकतेच काढलेले दूध ३) पुष्परस ५) एक दुधाची मिठाई ६) झाडाखाली बसण्याची जागा ७ अ) सोने ९) भीतीने उडणारी ११) विदेशी मद्य १२) होडी १३) ऋतू १६) न आठवणे १७) दंग १९) शंभर २१) सुगंध २२) दंग २३) दुस्वास / राग २५) एक विमानतळ २६) अधिकार असलेला २७) पवन २९) अग्नीचा साथीदार ३०) नवरदेव ३१) तुपाची खरवड

(उत्तरे इतरत्र)

# पर्यावरणाचा ऱ्हास टाळायला हवा

**– सौ. पूर्वा देवधर,** गिरगांव

समजा तुमच्या जेवणाच्या ताटात तुमच्या साठी प्लास्टिकचे विविध आकारांचे छान छान रंगीबेरंगी तुकडे ठेवले आणि बाजूला एका छानशा पेल्यात प्लास्टिक मिश्रित पाणी दिलं तर ते तुमच्या घशाखाली उतरेल का?

काय? नाही उतरणार? पण तुम्हाला माहितीये का आपण प्रत्येक जण प्रत्येक आठवड्याला एका व्हिजिटिंग कार्ड एवढं प्लास्टिक नकळत खात आहोत.

१९३० पासूनचा जो प्लास्टिकचा कचरा काही टक्के समुद्रात आणि काही टक्के नद्यांच्या आत आणि काठांवर, गावच्या वेशीच्या आजूबाजूला, विविध शहरांच्या डम्पिंग ग्राउंड्स वर ढिगांनी, डोंगराएवढ्या मोठ्या ढिगांनी ठिकठिकाणी पडला आहे त्याचे परिणाम आता जाणवू लागले आहेत.

प्लास्टिकचे दुष्परिणाम असे इंटरनेटवर सर्वेक्षण केले तर पुढील रिझल्ट मिळतात.

समुद्राच्या पाण्यावरील मिठागरात तयार होणाऱ्या मिठात बऱ्याच अंशी मायक्रो प्लास्टिक आहे. मायक्रो म्हणजे साध्या डोळ्यांना न दिसणारं पण त्याचं अस्तित्व नक्कीच असणारं. म्हणजे फक्त मांसाहारी लोकांच्या आहारात प्राण्यांवाटे प्लास्टिक जातं, एवढेच नव्हे आता तर शाकाहारी लोकांच्याही रक्तात प्लास्टिकचे अंश मिळू लागले आहेत. कारण मीठ आपण सगळेच खातो.

समुद्राच्या तळाशी पाणबुड्यांच्याद्वारे सर्वेक्षण केलं असता अंदाजे एका चौरस फुटामध्ये सहज काही किलो प्लास्टिक आणि मायक्रो प्लास्टिक दोन्ही आढळलं. म्हणजे समुद्राच्या तळाशी साचून राहिलेलं सर्व प्लास्टिक जर बाहेर काढलं तर आपली पृथ्वी ढवळून निघेल आणि प्लास्टिकमुळे गुदमरेल.

आणखीन कहर म्हणजे पावसाच्या पाण्याचा सर्व्हे केल्यावरही त्यात मायक्रो प्लास्टिक खूप मोठ्या प्रमाणात आढळू लागलं आहे.

गर्भवतींच्या सोनोग्राफी रिपोर्ट मध्ये माता, मातेची वार यात मायक्रो प्लास्टिक आढळू लागलं आहे.

आहे की नाही? मन सून्न करणारी बाब.

कधी थांबणार हे सगळं? पुढल्या पिढ्यांना शुद्ध अन्न पाणी सुद्धा आपण देऊ शकत नाही. आपल्या पिढ्यांनी त्याची वाट लावलीच आहे पुढील पिढ्या आपल्याला अनेकदा दोष देणार की तुमच्या वेळी हे सगळं कळत असून तुम्ही सावध का नाही झालात?

अजूनही वेळ गेली नाही आपण सावध होऊ शकतो कसं ते पाहूया पुढीलप्रमाणे.

सकाळी उठल्या उठल्या प्लास्टिक ब्रश आपण तोंडात घालतो. जेव्हा कधी तो तीनचार महिन्यांनी बाद करतो तेव्हा ते प्लास्टिक कुठेतरी जातं आणि पाचशे सहाशे वर्ष तसंच एका जागी पडून राहतं नष्ट होत नाही. त्यामुळे आपण पूर्वीच्या काळासारखं कडुलिंबाचं दातवण, तुरटी, आयुर्वेदिक दंतमंजन किंवा बांबूचे टूथ ब्रश वापरायला लागावं.

चहा दूध कॉफी किंवा इतरही कुठलेही

पेय थर्माकोलच्या किंवा प्लास्टिकच्या कपात घेऊ नये. थर्माकोलच्या किंवा अगदी कागदाच्या कपांना ही प्लास्टिकचं पातळ थराचं आवरण असतंच. डीप डीप डीप करणाऱ्या चहाच्या छोट्या पिशव्यांमध्येही बटर पेपर असला तरी प्लास्टिकचा अंश असतोच. त्यामुळे या सगळ्या गोष्टी टाळाव्यात.

प्लास्टिकच्या बश्या, चमचे, काटे, वाट्या, ताटं, बाऊल, पेले, स्ट्रॉ, बशा डबे-बाटल्या या सर्व कितीही जाडीच्या किंवा कितीही पातळ असल्या तरी या प्रकारची प्लास्टिकची भांडी आपल्याजवळ नसावीत आणि आपण विकतही घेऊ नयेत. का? तर एकदा वापरून फेकून देण्याच्या अतिशय घाणेरड्या आणि आळशी पद्धतीमुळे आपल्याकडचे कचऱ्याचे ढीग वाढत आहेत आणि या प्लास्टिकचा अंश तुमच्या खाद्यपदार्थाला किंवा पाण्याला किंवा इतर पेयाला लागला तर त्या गोष्टी तुमच्या रक्तात पोहोचतात आणि तुम्हाला कॅन्सरसारखे भयानक रोग होतात.

प्लास्टिक बाटल्यांमधील पाणी शक्यतो टाळावे कारण त्यावर एक्सपायरी डेट असते ती कशासाठी असते, तर अमुक तारखेनंतर या बाटलीमधील पाण्यावर या बाटलीच्या प्लास्टिकचा परिणाम होऊ शकतो. म्हणजेच अमुक तारखेनंतर हे पाणी पिण्याजोगं नाही.

पण एवढ्या बारीकसारीक गोष्टींकडे बघायला आपल्याला वेळ नसतो किंवा हे माहीतही नसतं.

साठवणीसाठी प्लास्टिकच्या मोठ्या डब्यांमध्ये बरण्यांमध्ये किंवा बाटल्यांमध्ये सुके पदार्थही ठेवू नयेत कारण कालांतराने त्या सुक्या पदार्थांवर किंवा पिठांवरही प्लास्टिकचा वाईट परिणाम होऊन प्लास्टिक आपल्या रक्तात जातं.

नवनवीन फॅशनची काळी भांडी, काळे तवे, कढया यात दुसरं तिसरं विशेष काही नसून जाळून काळं केलेलं प्लास्टिकच असतं. सुबक आकर्षक (पण प्लास्टिकचीच) भांडी आरोग्यावर काही दुष्परिणाम करत नाहीत या कंपन्यांच्या दाव्यांना, भुलथापांना बळी पडू नका.

त्यापेक्षा, लोखंडी तवे, कढया, कालथे, स्टील, तांबे, पितळ या धातूंची आपली पारंपरिक भांडीच योग्य आहेत. हल्ली भांड्यांच्या दुकानात कल्हई लावलेली भांडीही विकत मिळतात. दर तीन वर्षांनी एकदा पुन्हा ते कल्हई लावून देतात.

कपडे-भांडी धुवायचे साबण, पावडरी यांमध्ये बऱ्याच अंशी प्लास्टिक असतं.

भांडी घासण्यासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिकचे ब्रश किंवा हिरव्या घासण्यांमध्येही प्लास्टिक असतं हे सगळं टाळण्यासाठी शक्य असेल तर नारळाच्या शेंडीपासून किंवा नारळाच्या सालापासून बनवण्यात येणाऱ्या घासण्या स्वतः तयार कराव्यात किंवा विकत घेऊन मिळवाव्यात. बाजारात किंवा ऑनलाईन सुद्धा मिळतात.

टॉयलेट क्लिनर, अंगाचे साबण, शांपू कपड्याचे साबण या बऱ्याच हानिकारक वस्तू असतात. त्यातही प्लास्टिकसारखी घातक द्रव्ये असून, बाथरूममधून ते सगळं पाणी आपल्या मोठ्या मोठ्या जलाशयांमध्ये जाऊन तिथेही विषारी द्रव्य असलेले महासागराचे काही मोठमोठे भाग तयार झाले आहेत.

जलाशयातील जलचर, समुद्रापासून मिळणारे मीठ या सर्वात बऱ्याच अंशी मायक्रो

प्लास्टिक असतं. त्यामुळे नैसर्गिक घटकांपासून बनलेल्या गोष्टी आपण स्वच्छतेसाठी वापराव्यात

हल्ली पर्यावरण पूरक, विघटनशील, आयुर्वेदिक, इको फ्रेंडली किंवा बायोडिग्रेडिबल किंवा विघटनशील म्हणून मोठमोठे दावे करून स्वतःच्याच हाताने त्यावर सर्टिफिकेट लिहून, हिरवी पाने, हिरव्या वेली, हिरवळ, गवत असली फसवी स्टिकर्स लावून, आपल्याला गंडवलं जातं आणि अशा वस्तू आपल्या माथी मारल्या जातात. काही टक्के कंपन्यांचं म्हणणं खरं असून त्यांची प्रॉडक्ट्स काही प्रमाणात बायोडिग्रेडिबल असतातही पण त्यातही कमीत कमी प्लास्टिकचा अंश असतोच. प्लास्टिक काहीशे वर्षांनी विघटन पावतं तर या गोष्टी काही महिन्यांनी विघटन पावतात एवढाच फरक असू शकतो. तो सुद्धा फार कमी मान्यताप्राप्त कंपन्यांच्या प्रॉडक्ट मध्येच. सर्वांमध्ये तसं नसतं.

त्यामुळे आपण या कंपन्यांच्या दाव्यांना बळी न पडता शक्यतो स्वतःची हानी न होता आरोग्य कसं जपलं जाईल यासाठी पत्रावळी, द्रोण, केळीची पानं किंवा साधी धातूची भांडी आपल्या घरातील किंवा बाहेरील मोठ्या कार्यक्रमांमध्ये वापरावीत. पुरेशी नसतील तर भाडे देऊन मागवावीत.

बाहेर खाण्यापिण्याची वेळ येते तेव्हा वन यूज प्लास्टिक बंद झालेलं आहे. टपरी किंवा वडे भजीच्या गाडीवाल्यांनी दिलेल्या तथाकथित स्वच्छ भांड्यांमध्ये आपण जर खाणार नसू, तर आपण स्वतःजवळ कायम धातूचा एक पेला, एक वाटी, एक छोटी ताटली, आपला चमचा, काटा, स्ट्रॉ, पाणी प्यायला बाटली आणि रुमाल ठेवावा.

टिश्यू पेपरचा कचरा आपण अवास्तव विनाकारण वाढवत आहोत आणि झाडांवर अत्याचार तर करतच आहोत शिवाय टिश्यू पेपरच्या कचऱ्याचे डोंगर वाढवत आहोत. आणि अगदी अडल्या पडल्यासच अगदी भूकेने जीव कासावीस झाला असेलच तर आपल्या जवळची धातूची भांडी वापरून त्यात खावं प्यावं.

म्हणजे टपरी, स्टॉलवाल्यांकडच्या भांड्यांच्या स्वच्छतेची किंवा हायजिनची शंका नको. नाही तर स्वच्छ उपहारगृहांमध्ये खावं. नाहीतर उपास करावा ते फार छान आरोग्यासाठी. नाहीतर आपलं घरी जाऊनच काय ते खावं प्यावं.

कचऱ्याचा भस्मासुर आपल्यापुरता तरी टाळण्यासाठी स्वयंपाक घरातल्या ओल्या कचऱ्याचे खत तयार करावे. त्याची बरीच वानवा आहे.

सगळ्यांनी जर घरी खत तयार केलं तर शेती ,मळ्यातलं पीक वाढेल बागेतल्या फुलांना आणि फळांना बहर येईल आणि कृत्रिम रसायनांची खत फवारणीची गरज भासणार नाही. आपल्याच घरच्या खतावर जोपासलेल्या अन्नपदार्थांमुळे आपलं आरोग्य वाढीस लागेल शिवाय कचरा न केल्याचं समाधानही लाभेल.

अशाप्रकारे आपला ओल्या कचऱ्याचा प्रश्न आपण सोडवू शकतो.

सुक्या कचऱ्याच्या सर्व वस्तूंचे वर्गीकरण करण्याचे कष्ट एकदा तरी घ्यावेत आणि एकदा तशी सवय लागली की पुढे असं वर्गीकरण खूपच सोपं जातं

वापरात नसलेलं सर्व प्रकारचे प्लास्टिक इलेक्ट्रॉनिकच्या सर्व प्रकारच्या जुन्या वस्तू

काचेच्या, रबराच्या, लाकडाच्या सर्व प्रकारच्या वस्तू वेगवेगळ्या प्रकारे जमा करून आपल्या जवळच्या स्वच्छता अधिकाऱ्यांपर्यंत, वर्गीकरण करून रिसायकलिंगसाठी पोहोचवण्याचे जर कष्ट घेतले तर आपल्या कचऱ्याचे ढीग वाढत नाहीत.

मुळात आपण शून्य कचरा करण्याकडे जर कल ठेवला तर कचरा विल्हेवाट क्षेत्रापर्यंत किंवा डम्पिंग ग्राउंडपर्यंत आपला कचरा जाणारच नाही. यासारखी भाग्याची गोष्ट नाही.

हजार हत्तींचं बळ हा शब्दप्रयोग ऐकला असेलच तर अशा ९००० हत्तींच्या वजनाएवढा कचरा प्रत्येक शहरात रोजच्या रोज तयार होत आहे. आणि घराघरांतून डम्पिंग ग्राउंडवर तो पोहोचवण्यासाठी, मुंबई - न्यूयार्कच्या १०-१५ हवाई फेऱ्या करताना जेवढं इंधन खर्ची पडतं, तेवढं इंधन दररोज आपण जाळतो. त्यामुळे हवा प्रदूषित होते ते वेगळंच. डंपिंग ग्राऊंडवर काम करणारे, वर्गीकरण करणारे, कचरा उचलणारे, सर्व प्रकारचे स्वच्छता कर्मचारी ही देखील आपल्या सारखीच हाडामांसाची माणसं असून त्यांनाही आपल्यासारख्याच भावना असतात. घाण उचलताना त्यांनाही किळस वाटते. त्यांचं कर्तव्य बजावताना त्यांना त्रास होऊ नये म्हणून ते व्यसनं जवळ करतात. म्हणजे त्यांच्याही आरोग्याला, पर्यायाने त्यांच्या कुटुंबीयांनाही आपल्यामुळे त्रास.

बघा, माणसाच्या कचरा निर्माण करण्याच्या घाणेरड्या वृत्तीमुळे किती प्रकारचा किती जणांना त्रास होतो. किती इंधन जळतं, किती वायू प्रदुषण होतं. यासाठी कचरा होऊच न देणं उत्तम.

प्लास्टिकचे वापरात नसलेले, जुने मोठेमोठे ड्रम, टाक्या, टीव्ही वॉशिंग मशीनची पॅकिंगची खोकी, मोठेमोठे प्लास्टिकचे बलूनवाले कागद सर्व प्रकारच्या वस्तू वेगवेगळ्या नीट ठेवून योग्य वेळी योग्य त्या ठिकाणी द्याव्यात.

हल्ली बऱ्याच गावांमध्ये, शहरांमध्ये अशा वर्गीकरण करणाऱ्या संस्था निघालेल्या आहेत त्यांचा शोध घ्यावा.

अशा अनेक संस्था जुने प्लास्टिक, जुन्या इलेक्ट्रॉनिक वस्तू, इत्यादी सर्व वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तूंचं रियुज रिसायकल किंवा पुनर्वापर करून किंवा दुसऱ्या योग्य मार्गाने विल्हेवाट लावतात. उदाहरणार्थ प्लास्टिक पासून इतर अनेक टिकाऊ वस्तू बनतात, रस्ते, बांधकामं यात मजबूतीसाठी यांचा वापर करता येतो. प्लास्टिक पासून क्रुड ऑईल, किंवा इंधन तेल तयार केलं जातं, अशा कामांसाठी गरजू लोकांना रोजगारातून पैसे मिळतात.

अशाप्रकारे आपण आपल्याकडच्या सर्व कचऱ्याचे विघटन जर घरच्या घरीच केलं आणि शून्य कचरा या उपक्रमाचे मानकरी ठरलो तर त्यासारखं सुख, दुसरा आनंद नाही आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यात आपला मोठा सहभाग असेल

आणि अर्थातच स्वच्छ परिसर ,स्वच्छ जलाशय, पिण्याचे शुद्ध पाणी, उत्तम आणि शुद्ध अन्नपदार्थ सर्वांनाच मिळू शकतात असं घडलंच तर, पुढील पिढ्याही आपल्याला दुवा देतील. यासारखी समाधानाचीची बाब नाही.

बघा ,करा विचार करा.

***




*२७ ऑक्टोबर २०११ रोजी पार पडलेल्या अग्नि - ५ या आंतरखंडीय क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीने भारताची वैज्ञानिक क्षमता आणि संरक्षण सिद्धता या दोन्ही क्षेत्रातील आत्मनिर्भरतेचे दर्शन घडले. या क्षेपणास्त्राच्या वैशिष्ट्यांबद्दल थोडे विवेचन ....*

संपूर्ण स्वदेशी तंत्राने बनलेल्या अग्नि - ५ च्या नुकत्याच पार पडलेल्या उपभोक्ता चाचणीमध्ये लष्कराच्या स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांडने त्याच्या स्थापनेनंतर १७ वर्षांनी केलेली पहिलीच आंतरखंडीय क्षेपणास्त्राची चाचणी आणि रात्रीच्या वेळी अचूकतेने पार पडलेली चाचणी अशी दोन वैशिष्ट्ये आहेत. १५०० किलो वजनाचे युद्धशीर्ष घेऊन ध्वनीच्या २४ पट गतीने हे क्षेपणास त्याच्या निर्धारित लक्ष्यावर आदळलं आणि ५००० से ८००० किलोमीटरच्या टप्प्यातील लक्ष्यावर अचूकपणे मारा करण्याची भारताची क्षमता शास्त्रज्ञांनी सिद्ध केली.

आयजीएमडीपी (इंटिग्रेटेड गायडेड मिसाइल डेव्हलपमेन्ट प्रोग्राम) या १९९० मध्ये सुरू झालेल्या कार्यक्रमा अंतर्गत जमिनीवरून डागली जाणारी आणि जमिनीवरील लक्ष्य भेदणारी 'पृथ्वी' क्षेपणास्त्रे, जमिनीवरून हवेतील लक्ष्य भेदणारे 'आकाश' क्षेपणास्त्र कमीतकमी वेळात लक्ष्यभेद करणारे 'त्रिशूल' आणि रणगाडाभेदी 'नाग' आदी क्षेपणास्त्रांचा विकास केला गेला. सध्या या क्षेपणास्त्रांच्या विकसित आवृत्त्या संरक्षण दलांत तैनात आहेत. या गटातील पाचवे क्षेपणास्त्र म्हणजे 'अग्नि'. 'पृथ्वी' क्षेपणास्त्र १०० किलोमीटर अंतरावरील लक्ष्यभेद करणारे होते. तर 'अग्नि' हे किमान एक हजार किलोमीटर अंतरावरील लक्ष्य भेदणारे आहे. या श्रेणीतील अग्नि-१ एक हजार, अग्नि-२ दोन हजार तर अग्नि-३ पाच हजार किलोमीटर अंतरापर्यंत लक्ष्यभेद करू शकते. त्यांची निर्मिती करताना अनेक प्रकारचे अद्ययावत तंत्रज्ञान आणि स्वदेशी तंत्रज्ञान प्रणाली विकसित केल्या गेल्या.

प्रचंड ताण आणि भार सहन करू शकणारा क्षेपणास्त्र सांगाडा आणि त्यावर जोडल्या जाणाऱ्या प्रणोदन, निर्देशन, नियंत्रण आणि युद्धशीर्ष आदि वेगवेगळ्या प्रणाली, त्याच्या प्रक्षेपणाची यंत्रणा, प्रक्षेपणानंतर त्याला आवश्यक असणारी रडार यंत्रणा आणि स्वतंत्र

क्षेपणास्त्र संगणकीय प्रणाली तसेच विविध प्रकारचे सेन्सर्स या साऱ्यांचा विकास भारतीय शास्त्रज्ञांनी स्वतंत्रपणे केला आहे, हा या क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमामधील मोठा विशेष आहे.

अग्नि - ५ या माऱ्याचा टप्पा खूप लांबचा असल्याने त्याची इंधन प्रणोदन प्रणाली तीन टप्प्यांची बनलेली आहे. या क्षेपणास्त्राची लांबी १७.५ मीटर, व्यास दोन मीटर, वजन ५० टन तर किंमत ५० कोटी रुपये आहे. पंचावन्नशे ते आठ हजार किलोमीटर दूर वरील लक्ष्यभेद करताना जास्तीत जास्त चाळीस किलोमीटरची चूक होईल एवढी अचूकता या क्षेपणास्त्र प्रणालीत आहे.




एवढे प्रचंड अंतर कापण्यासाठी हे क्षेपणास्त्र पृथ्वीच्या वातावरणाच्या थरांबाहेर जाते आणि लक्ष्याच्या दिशेने पुन्हा वातावणात प्रवेश करते. त्या वेळी त्याचा वेग ध्वनीच्या वेगाच्या २४ पट इतका प्रचंड असतो. वातावरणात प्रवेश करताना होणाऱ्या घर्षणामुळे युद्धशीर्षावरील आवरण ३०००° सेल्सियस इतके प्रचंड तापते. एवढ्या तापमानात ते जळून जाऊ नये यासाठी ते खास उष्णतारोधी कार्बन कंपोझिटचे बनलेले असते.

हायपरसोनिक (आवाजाच्या वेगाच्या सहा ते सात पट गतीने मारा करणारी) क्षेपणास्त्र आणि एकाच वेळी वेगवेगळ्या लक्ष्यांवर भेद करणारी एस.आय.आर.व्ही. प्रकारातील क्षेपणास्त्रे हे या आय.जी.एम.डी.पी. कार्यक्रमाचे पुढचे टप्पे असून, त्याचे कामही अंतिम टप्प्यात आहे. त्यांच्या विकासातून 'समर्थ भारत सशक्त भारत' ही घोषणा सार्थक करण्याचा शास्त्रज्ञांचा प्रयत्न आहे.

**श्री. काशिनाथ देवधर**, पुणे
९८८१२५३४२५

(लेखक हे संरक्षण, संशोधन व विकास संस्थेतील (डीआरडीओ) चे वरिष्ठ निवृत्त शास्त्रज्ञ आहेत.)

अल्पपरिचय :

# भारताच्या माजी क्रिकेटपटू सौ. रूपांजली देवधर

आपल्या मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य **श्री. समीर देवधर** (डोंबिवली) हे मंडळाच्या सभासदांशी संपर्क राहावा म्हणून वेगवेगळ्या किमान चार ते पाच सभासदांना रोज दूरध्वनीद्वारे संपर्क करीत असतात. त्याचप्रमाणे जी देवधर, दीक्षित अथवा ढमढेरे मंडळी कौशिक गोत्री आहेत, पण ती मंडळाचे सभासद नाही अशांनाही शोधून, त्यांचे दूरध्वनी क्रमांक मिळवून त्यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न करतात. त्यातूनच इंदोर येथील एका देवधर परिवाराशी संपर्क झाला असता एक कुलभगिनी सौ. रूपांजली देवधर यांची माहिती मिळाली. भारताच्या महिला संघाकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेल्या या रूपांजली देवधर यांचा अल्पपरिचय त्यांच्याकडून प्राप्त झाला तो देत आहोत.

रूपांजली सुनिल देवधर यांचा जन्म सांगीतिक वारसा असलेल्या शास्त्री कुटुंबात नोव्हेंबर १९७५ मध्ये झाला. लहानपणापासूनच त्यांना सर्व खेळांमध्ये रस होता. विशेषत: क्रिकेट या खेळाचा तर त्यांनी ध्यासच घेतला होता.

क्रिकेटचे व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन त्यांनी स्थानिक पातळीवर सिद्ध करीत भारतीय महिला संघात स्थान मिळविले.

एक कसोटी व दोन बारा एकदिवसीय सामन्यांमध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. परंतु दुर्दैवी अशा दुखापतीमुळे त्यांना क्रिकेट या खेळालाच सोडचिठ्ठी द्यावी लागली.

सन १९९८ मध्ये त्यांना विक्रम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. सन २०१७ मध्ये इंदोर येथील मैदानावर झालेल्या आयपीएल सामन्यादरम्यान त्यांचा बीसीसीआय तर्फे गौरव करण्यात आला होता.

१९९७ पासून आजतागायत त्या वेस्टर्न रेल्वेमध्ये कार्यरत आहेत. सध्या त्या Ch OS, ACM, ऑफिस म्हणून इंदोर येथे कार्यरत आहेत.




सध्या त्या मध्यप्रदेश क्रिकेट असोसिएशन तर्फे वरीष्ठ महिला संघाच्या निवड समितीच्या सदस्य म्हणून क्रिकेटसाठी योगदान देत आहेत.

त्या मध्यप्रदेश क्रिकेट असोसिएशनच्या तसेच भारतीय क्रिकेट असोसिएशनच्या आजीव सदस्य आहेत.

सौ. रूपांजली या सन २००८ मध्ये श्री. सुनिल देवधर (इंदोर) यांचेबरोबर विवाहबद्ध झाल्या असून आपले पती आणि आपली चौदा वर्षांची कन्या कु. अवनी यांचेसह इंदोर येथेच वास्तव्यास आहेत.

सौ. रूपांजली व त्यांच्या कुटुंबीयांना हार्दिक शुभेच्छा!

## देवधर मंडळ – वाटचाल जाहिराती

आपले त्रैमासिक, 'वाटचाल' सर्व कुलबंधू भगिनींना नित्यनेमाने आपली प्रगतीची वाटचाल कळवित असते. हे त्रैमासिक रंगीत अधिकाधिक, वाचनीय आणि संग्राह्य होत आहे.

आता यात आपल्या उद्योग, व्यवसाय याची माहिती जाहिराती द्वारे देता येईल. यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाईल. आपण यास भरभरून प्रतिसाद द्यावा ही विनंती.

**✻ जाहिरातीचे दरपत्रक ✻**

✻ १/४ पान रुपये १००/-

✻ १/२ पान रु. २००/-

✻ पूर्ण पान रु. ४००/-

यात शुभेच्छा जाहिराती सुद्धा देता येतील.

## आपण यांना अंतरलो

✻ दिगंबर महादेव देवधर, हडपसर (४ जून २०२२)

✻ सौ सुधा चंद्रकांत दीक्षित, डोंबिवली १८ जून २०२२.

✻ साधना रघुनाथ देवधर, डोंबिवली ४ जुलै २०२२

✻ जयंत नारायण देवधर, बोरिवली ५ जुलै २०२२

✻ शशिकांत गोविंद देवधर. नाहूर ७ जुलै २०२२

✻ गंगाधर नारायण देवधर. पुणे. ७ जुलै २०२२

✻ रत्नदीप देवधर (गोट्या) बडोदा १० जुलै २०२२

✻ मनोहर (सुरेश) सदाशिव देवधर, डोंबिवली २२ जुलै २०२२

### शब्दकोड्याची उत्तरे

**आडवे शब्द :–**

२) घाम ४) चारपाई ७) गतीरोधक ८) सर १०) नरम १२) तळ १४) कमला १५) रण १६) विसंगती १८) देव २०) सतर्क २१) सुर २४) वातड २६) सहवास २८) मधुमास ३०) वक्ष ३१) बेडर ३२) रमणा २३) रीम ३४) गीत

**उभे शब्द :–**

१) संगत २) धारोष्ण ३) मध ५) रसमलाई ६) पार ७अ) कनक ९) गाळण ११) रम १२) तर १३) वसंत १६) विसर १७) गर्क १९) शत २१) सुवास २२) रत २३) आकस २५) डमडम २६) सक्षम २७) वारा २९) धूर ३०) वर ३१) बेरी

www.deodharmandal1968.org

**या आपल्या वेबसाईटला अवश्य भेट द्या**

# यंदाच्या वार्षिक स्नेहसंमेलनातील क्षणचित्रे



वार्षिक स्नेहसंमेलनातील एका स्टॉलवर कुलबांधव



आपले विचार मांडताना भावगंधा देवधर – कर्वे



कु. सान्वी उन्मेश देवधर (पुणे) कला सादर करताना




अपर्णा देवधर (विलेपार्ले) सतारवादन करताना






कल्याण येथे संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ही वरील दोन क्षणचित्रे



संमेलनातील विशेष उपस्थिती – अभिनेत्री सायली देवधर



प्रमुख पाहुणे डॉ. दिलिप देवधर यांचे हस्ते स्मरणिका प्रकाशन



DRDO मधील माजी ज्येष्ठ संशोधक
श्री. काशिनाथ देवधर यांनी आपले विचार मांडले




कार्यक्रमस्थळी सर्वांचे लक्ष्य वेधून घेणारी
आकर्षक रांगोळी

Book Packet
Containing periodical
R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

प्रति,

माननीय

संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.